

# ✡ साईआश्रम भक्तनिवास ✡



Proposed " SAI ASHRAM " ( package I ) at Shirdi Tal-Rahta, Dist-Ahmednagar for
Shri Saibaba Sansthan trust Shirdi

D.O. Nikam
ARCHITECT AND INTERIOR DESIGNER
C.T.S. No. 587/B & 588,Pulachi Wadi,
Near Kohinoor Technical Institute,
Pune-04 Tel- 25510346/7

# ❖ साई धर्मशाळा ❖



Proposed " SAI ASHRAM " ( Package II ) at Shirdi Tal-Rahta, Dist-Ahmednagar for
Shri Saibaba Sansthan trust Shirdi

D.O. Nikam
ARCHITECT AND INTERIOR DESIGNER
C.T.S. No. 587/B & 588,Pulachi Wadi,
Near Kohinoor Technical Institute,
Pune-04 Tel- 25510346/7



Scanned by CamScanner

# ई-निविदा

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

## साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या इमारतीमध्ये पेस्ट कंट्रोल (किटकनाशक औषध फवारणी) करणे या कामाची ई-निविदा.

सन २०२३ – २०२४

(एक वर्ष कालावधीकरीता )



Scanned by CamScanner

## ❖ ई- निविदेच्या अटी शर्ती ❖

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या इमारतीमधील खोल्या व हॉल (भुभाग,छत,भिंती) त्यातील फर्निचर, संडास, स्नानगृह, गाद्या, कॉट इ. मध्ये भक्तांना ढेकूण, झुरळे व इतर किटकांचा त्रास होऊ नये म्हणुन किटकनाशक औषध फवारणी (पेस्ट कंट्रोल) करणेकामी ई-निविदा मागविण्यात येत आहेत यासंबंधीच्या सुचना, अटी/शर्ती खालीलप्रमाणे -

१) पेस्ट कंट्रोल कामी ई- निविदा ऑनलाईन भरावयाची आहे.

२) पुर्ण माहिती भरलेली निविदा मुदतीत ऑनलाईन सादर करावयाची जबाबदारी निविदाधारकांवर आहे.

अ) निविदाधारकास निविदेबाबत निविदा फी रु.३,०००/- ( अक्षरी रुपये – तीन हजार आठशे मात्र ) व बयाणा रक्कम रु. १५,०००/- ( अक्षरी पंधरा हजार मात्र ) शासनाचे www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन जमा करावी.

**ब ) ई- निविदे सोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्र सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.**

३) वाणिज्यिक बीड ( Commercial Bid ) उघडणे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदाधारकांनी याबाबत साईधर्मशाळा व साईआश्रम भक्तनिवास कार्यालयात संपर्क करुन माहिती घ्यावी.

४) अपुर्ण ई- निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

५) ई-निविदा फी व बयाणा रक्कम ऑन लाईन जमा केल्या शिवाय सादर केलेले बीड ऑफ कोटेशन (BOQ) चे Document उघडले जाणार नाही.

६) ज्यांची ई-निविदा मान्य होईल त्या निविदाधारकास कामाची हमी म्हणुन कार्यादेशाच्या मंजुर रक्कमेवर ५ % प्रमाणे होणारी रक्कम संस्थानकडे सुरक्षा अनामत म्हणुन बिनव्याजी ठेवावी लागेल. सदरची रक्कम कामाची वर्क ऑर्डर मिळाले नंतर आठ दिवसाचे आत संस्थानकडे जमा करणे बंधनकारक राहील.

७) निविदाधारकाची मागील तीन वर्षाची (२०१९-२०,२०२०-२१ व २०२१-२२) वार्षिक उलाढाल किमान रुपये १,००,००,०००/- (अक्षरी रु. एक कोटी ) असणे बंधनकारक आहे.

८) कमी जास्त दराची कोणतीही ई-निविदा स्वीकारण्याचा, नाकारण्याचा, अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. त्याबद्दलची कारणे, स्पष्टीकरण देणे संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहणार नाही.

९) निविदाधारकास खालील निवासस्थानांमध्ये पेस्ट कंट्रोल (किटकनाशक औषध फवारणी) करावयाचे आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं | विभाग | इमारतीचे नाव | खोल्या संख्या | हॉल संख्या | पेस्ट कंट्रोल खोल्या व हॉल मिळुन एकूण क्षेत्रफळ (चौरस फुटामध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | साईआश्रम भक्तनिवास | साईआश्रम भक्तनिवास | १५३६ | - | ३४९७३५.०० |
| २ | साई धर्मशाळा | साई धर्मशाळा | -- | १९२ | १५७९८३.३६ |
| | | एकुण - | १५३६ | १९२ | ५०७७१८.३६ |

१०) पेस्ट कंट्रोल करण्याचा कालावधी साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या दोन्ही निवासस्थानांमध्ये एक वर्षाचा राहील. (दि. ०१/०४/२०२३ ते दि. ३१/०३/२०२४)

११) टेक्निकल बीडचे प्रत्येक पानावर ई-निविदाधारकाची स्वाक्षरी व फर्मचा शिक्का असावा.

१२) निविदाधारकाने बीड ऑफ कोटेशन (BOQ) सादर करतांना सर्व कर वगळुन अंतिम दर देणे बंधनकारक आहे.

१३) निविदाधारक ठरलेल्या वेळेत काम करत नसेल, कामात चालढकल करत असेल अथवा समाधानकारक काम केले नाही त्यामुळे इतराकंडुन करुन घेण्यात आलेल्या कामापोटी संस्थानचे झालेले नुकसान निविदाधारकास द्यावे लागेल. त्याप्रमाणे प्रत्येक दिवसाला रु. ५००/- प्रमाणे वाढीव नुकसान (Penalty) संस्थानला द्यावयाचे आहे. दंडाची रक्कम निविदाधारकाच्या बीलातुन परस्पर कपात करण्यात येईल.



Scanned by CamScanner

१४) निविदाधारक ठरलेल्या वेळेत काम करत नसेल, कामात चालढकल करत असेल अथवा समाधानकारक काम करत नसेल तर अथवा पेस्ट कंट्रोलचा काहीच परीणाम होत नाही असे आढळुन आल्यास, संस्थान कोणतीही पुर्व सुचना न देता कॉन्ट्रॅक्ट करार रद्द करेल व निविदाधारक यांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येवून ३ वर्ष काळ्या यादीत नाव टाकण्यात येईल.

१५) न्युनतम दरानुसार मंजुर झालेल्या कामाबाबतचा कार्यादेश देण्यात येईल,त्यानुसार काम करावे लागेल. वाढीव कामाची मागणी करता येणार नाही. दिलेले काम वेळेत न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१६) निविदाधारकास काही तांत्रिक स्वरुपाच्या अडचणी असल्यास ई-निविदा कक्ष (सी.सी.टी.व्ही) फोन नं. (०२४२३) २५८९२९ या क्रमांकावर संपर्क साधावा. ई-निविदेमधील अटी-शर्तींचा व देण्यात येणा-या कागदपत्रांचा अभ्यास करुन निविदा सादर करावी, निविदे संबंधी काही शंका असेल तर त्याची साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे कार्यालयात दुरध्वनी क्रमांक – साई धर्मशाळा विभाग (०२४२३) २५९६०५, २५९६०१ तसेच साईआश्रम भक्तनिवास (०२४२३) २५९३०२ वर संपर्क करावा.

१७) निविदाधारकांने टेक्निकल व बीड ऑफ कोटेशन (BOQ) अशा दोन प्रकारच्या ई-निविदा सादर करतांना काही माहिती अपुरी ठेवल्यास/राहिल्यास त्या ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द समजण्यात येतील, अंतिम निर्णय श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेसाठी राखीव असेल.

१८) नमुद केलेल्या इमारतीमध्ये एक वर्ष कालावधीकरीता पेस्ट कंट्रोल करणे आहे. सदर इमारतीमध्ये कोणत्याही किटकांचा नाश झाला नाही अगर जिवंत असल्याचे दिसुन आल्यास निविदाधारकास स्वखर्चाने पुनश्च तक्रार निवारण होईपर्यंत फवारणी करुन दयावी लागेल. त्याकरीता निविदाधारकाचे कामगार कायम उपलब्ध ठेवावेत.

१९) निविदाधारंकास पेस्ट कंट्रोल करण्यापुर्वी संबंधीत विभागाकडुन कळविण्यात येईल, त्यानुसार खोल्या, हॉलमध्ये औषध फवारणी करुन द्यावी लागेल.

२०) औषध फवारणीसाठी लागणारे औषध,पंप, साहीत्य वगैरे साहीत्य व कामगार निविदाधारकाने स्वखर्चाने पुरवावयाचे आहेत.

**२१) खालील तपशिलाप्रमाणे तांत्रिक कागदपत्रांची (Technical Bid) स्कॅन करुन ऑनलाईन अपलोड करावेत.**

| अ.नं. | कागदपत्रांचा तपशील | जोडले असल्यास ✓ मार्क करावे |
|---|---|---|
| १ | रु. १५,०००/- बयाना रक्कमेची शासनाचे वेबसाईटवर भरलेली पावती | |
| २ | ई – निविदा फी रु.३,०००/- रक्कमेची शासनाचे वेबसाईटवर भरलेली पावती | |
| ३ | आय.एस.ओ. (I.S.O.) मानांकन ( प्रमाणपत्राची सत्य प्रत). | |
| ४ | Licensing Authority ची प्रमाणीत सत्यप्रत. | |
| ५ | दुकान निरीक्षक यांचा नोंदणीकृत दाखला ( प्रमाणीत सत्यप्रत). | |
| ६ | आयकर नोंदणी पॅन कार्ड (प्रमाणीत सत्यप्रत). | |
| ७ | प्राव्हींडट फंड स्वतंत्र कोड नंबर (कोड ड्रॉप्ट लेटरची प्रमाणीत सत्यप्रत) | |
| ८ | GST नोंदणी प्रमाणपत्र किंवा ऑन लाईन GST क्रमाक पावती (प्रमाणीत सत्यप्रत). | |
| ९ | शासकीय/निमशासकीय / पंचताराकींत हॉटेल येथे काम करत असलेल्या कामाविषयी कार्यादेशाच्या प्रती (प्रमाणीत सत्यप्रत). | |
| १० | शासकीय कामाचा ३ वर्षाचा अनुभव असावा. | |
| ११ | खालील प्रमाणे कोणतेही एक मान्यता प्राप्त ऑपरेटरचे ट्रेनिंग प्रमाणपत्र असणे आवश्यक.<br>१) Central Food Technological Resarch Institute अथवा<br>२) Technical Training For PMPs अथवा<br>३) Storage Pest Management & Fumigation (भारतीय अनाज संचयन संस्थानचे Indian Grain Storage Institute प्रमाणपत्र) अथवा<br>४) The Pest Management Course कोणत्याही मान्यताप्राप्त Institute चे प्रमाणपत्र<br>• निविदाधारकाने स्वयंघोषित ऑपरेटरचे ट्रेनिंग प्रमाणपत्र केलेले असल्यास ते ग्राह्य धरले जाणार नाही. | |
| १२ | सन २०१९-२०२०, २०२०-२०२१ व २०२१-२०२२ या तीन आर्थिक वर्षाचे वार्षिक उलाढालीचे चार्टड अकांऊटंट (Chartered Accountant) यांचेकडील प्रमाणपत्र सत्यप्रती. | |
| १३ | आपल्या फर्मचे नाव ब्लॅक लिस्टेड नसले / असले बाबतचे हमीपत्र लेटर हेडवर सही शिक्यानिशी सादर करावे ( Self Declaration ) | |

२२) पेस्ट कंट्रोल कामी नियुक्त केलेल्या कामगाराचे जाणे/येण्याचा खर्च तसेच चहा/पाणी/जेवण/नाष्टा/राहणेचा वगैरे खर्चही निविदाधारकाने स्वत: करावयाचा आहे.



Scanned by CamScanner

२३) पेस्ट कंट्रोल कामी नियुक्त केलेल्या कामगारांना कोणत्याही प्रकारची विषबाधा/संसर्ग अगर इतर कारणास्तव काही त्रास झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकावर राहील. संस्थानवर कुठल्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही. आपण नियुक्त केलेल्या कामगारांचे कोरोना -१९ प्रतिबंधक लसीकरण पुर्ण केलेले असावे त्यांचे प्रमाणपत्र इकडील कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

२४) पेस्ट कंट्रोल कामी नियुक्त केलेल्या कामगाराचे वेतन /भविष्य निर्वाहनिधी /व्यवसायकर/आयकर/ सेवाकर व ऐनवेळी उदभवणा-या इतर सर्व कायदेशीर बाबींची जबाबदारी निविदाधारंकावर राहील. त्यास कोणत्याही प्रकारे संस्थान जबाबदार राहणार नाही.

२५) निविदाधारकास प्रत्येक औषध फवारणीचे वेळी विभाग प्रमुख सांगतील त्या अधिकारी / कर्मचारी यांचे समक्ष पेस्ट करुन दयावी लागेल.

२६ ) निविदाधारकास संस्थानकडून किटकनाशक औषधे साहित्य ठेवणेकामी एक स्टोअर रुम निविदा कालावधीत मोफत देण्यात येईल.

२७) पेस्ट कंट्रोल करणेकामी देण्यात आलेल्या चौ.फु.दरामध्ये खोल्या, छत, भुभाग, चार भिंती त्यातील फर्निचर, संडास बाथरुम, गादया, कॉट, लॉकर्स, क्लोकरुम, हॉल, गॅलरी, साईड गटार, चेंबर्स इ.चा समावेश राहील. बील हे चटाई क्षेत्राचे मोजमापा प्रमाणे अदा केले जाईल.

२८) कार्यादेशात इमारतीव्यतिरीक्त पेस्ट कंट्रोल करावयाच्या इमारतीमध्ये वाढ झाल्यास, वाढीव इमारतीचे आकारमानानुसार प्रती चौरस फुटास मंजुर दराने व त्याच दराने वाढीव इमारतीमध्ये या करार कालावधीत पेस्ट कंट्रोल करुन देणे निविदाधारंकावर बंधनकारक राहील त्यासाठीचे अटी व शर्ती आहे त्याच राहतील ज्या वाढीव इमारतीमध्ये पेस्ट कंट्रोल करावयाचे आहे त्या बाबत निविदाधारकास स्वंतत्र पत्र देऊन कळविण्यात येईल.

२९) एक वर्षाचे कालावधीमध्ये प्रती दोन महिन्यानंतर एक फवारणी अशा कमीतकमी सहा फवारण्या करणे आवश्यक आहे, अशा केलेल्या प्रत्येक फवारणी नंतर एकुण मंजुर रक्कमेच्या १० % एवढे किंवा झालेल्या कामाचे मंजुर दराने होणा-या रक्कमे इतके बील निविदाधारकाने संबंधित विभागाकडे सादर करावे. शिल्लक राहणारी रक्कम मुदती अखेर (कामाचे पुर्ततेनंतर) आदा केली जाईल.

३०) एक वर्ष करार कालावधीत कोणत्याही कारणांसाठी अथवा सबबीवर निविदाधारकास दरवाढ मिळणार नाही निश्चित केलेल्या दरानेच पेस्ट कंट्रोल वाढीव इमारतीसह काम करावे लागेल .

३१) पेस्ट कंट्रोलचे कामी नियुक्त केलेल्या कामगारांचे, कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधी-१९५२ चे कायदयानुसार करावी लागणारी सर्व पुर्तता , त्याबाबत कागदपत्रे अदयावत ठेवणे याची जबाबदारी निविदाधारंकाची राहील.

३२) नियुक्त केलेल्या कामगाराचे संबंधित कॉन्ट्रॅक्ट लेबर ( रेग्युलेशन ॲण्ड ॲबॅलिशन) ॲक्ट १९७० नुसार हजेरी रजिस्टर, वेतन पत्रके, वगैरे अनुषगिक कागदपत्रे विहीत नमुन्यात ठेवणे तसेच सदरच्या कायदयानुसार त्यांची पुर्तता करणे ही संपुर्ण जबाबदारी निविदाधारकाची राहील.

३३) निविदाधारंकाकडुन नियुक्त केलेल्या कामगारानी साईभक्तांशी, नागरीकाशी, संस्थान अधिकारी / कर्मचारी यांच्याशी गैरवर्तन करणार नाही यांची काळजी निविदाधारंकाने घ्यावयाची आहे.

३४) निविदाधारकांस इमारतींच्या सभोवतालच्या परीसरात ड्रेनेज / चेबर्स या ठिकाणी औषध फवारणी करावी लागेल.

३५) निविदाधारकास पेस्ट कंट्रोल करतांना मधमाश्याचे मोहोळ आढळुन आल्यास ते मोफत काढावे लागेल.

३६) पेस्ट कंट्रोल करणेकामी Sub Contractor नेमता येणार नाही. कर्मचा-यांना आपले कंपनीचे गणवेश व सुरक्षतेबाबतचे साहित्य दयावे लागतील..

३७) पेस्ट कंट्रोल करणेकामी Central Insecticide Boards ने Approve केलेले (House Hold) (Aimco Pesticides Ltd, Bayer CropScience Ltd, Bharat Rasayan Ltd.) औषध वापरणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

३८) निविदाधारकास सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे नियमानुसार योग्य त्या रकमेच्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र करुन दयावे लागेल व त्यास येणारा खर्च निविदाधारकाने स्वत: करावयाचा आहे.

३९) उपरोक्त अटी-शर्तीपैकी एक किंवा अनेक कोणत्याही अटी शर्तीचा भंग झाल्यास निविदाधारकाने भरलेली सुरक्षा अनामत रक्कम संस्थान जमा राहिल. संस्थानचे झालेली नुकसानीची, नुकसान भरपाई निविदाधारंकाकडुन वसुल करण्यात येईल.

४०) उपरोक्त अटी-शर्तीपैकी एक किंवा अनेक किंवा कोणत्याही अटी-शर्तीत बदल करणे, सुधारणा करणे व जादा अटी शर्ती विहीत करणे याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखुन ठेवलेला आहे.



Scanned by CamScanner

४१) Technical Document मधील पान नं.३ अं.नं.१ मध्ये नमुद केलेले तांत्रिक कागदपत्रे (Technical Bid) स्कॅन करुन online Upload करावेत.

४२) Tender Document व Technical Document हे महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरुन Download करुन Tender Document मधील व Technical Document मध्ये आवश्यक ती माहिती भरुन त्यावर फर्मचा शिक्का व सही करुन online Upload करावेत.

४३) ई-निविदा सादर करण्यापुर्वी ज्या निविदाधारकांना कामाची माहीती घ्यावयाची असेल अशा निविदाधारकांनी ई-निविदा टेंडर सादर करण्या पुर्वी साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा इमारतीमध्ये समक्ष जाऊन/कामाची पहाणी व सखोल अभ्यास करुन माहीती घेवून बीड ऑफ कोटेशन ( BOQ ) मध्ये सर्व कर वगळुन अंतिम दर दयावेत.

४४) बीड ऑफ कोटेशन ( BOQ ) अपलोड करतांना निविदाधारकांने फक्त मुळ रक्कम नमुद करावी. शासन नियमाप्रमाणे वेळोवेळी लागू होणा-या दरानुसार GST रक्कम संस्थानमार्फत देण्यात येईल. सदर GST ची रक्कम विहीत मुदतीत शासनाकडे भरणा करणेबाबतची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकाची राहील. तसेच शासनाकडे GST भरणा केलेबाबतचे चलन व बील निहाय गोषवारा तसेच फवारणी नंबर बीलासोबत संस्थानकडे सादर करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

४५) नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल.

४६) कोणतेही कारण न देता निविदेच्या कोणत्याही टप्यावर निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवला आहे.

४७) सदरच्या व्यवहाराबाबत काही वाद उपस्थित झाल्यास कोर्ट कारवाई करणे भाग पडल्यास उभय पक्षकारांना सदरचा वाद हा मा. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन/ सिनियर डिव्हीजन राहाता कोर्ट, मा.जिल्हा व सत्र न्यायालय, कोपरगांव, मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद,या न्यायालयाचे अधिकार कक्षेत उपस्थीत करता येईल. अन्य कोर्टात वाद दाखल करता येणार नाही.

४८) औषध फवारणीचे काम तांत्रिक कारणामुळे बंद करावयाचे असल्यास संस्थानला किमान ०३ महीने अगोदर लिखीत पुर्व सुचना देणे निविदाधारकावर बंधनकारक राहिल. अशा परीस्थीतमध्ये निविदाधारकाची सुरक्षा अनामत रक्कम संस्थानकडुन जप्त करण्यात येईल.

४९) पुढील वर्षासाठी निविदा प्रक्रीया होई पावेतो, आहे त्याच मंजुर दरामध्ये काम सुरु करेपर्यंत किंवा ०३ महिने पावेतो काम करुन देणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही, मागता येणार नाही.

५०) सदर प्रकरणी करावाचा करारनामा नोंदणीकृत करणेसाठी येणार खर्च निविदाधारक यांना करावा लागेल. पुरवठादार यांनी कार्यादेश मिळाल्यानंतर १५ दिवसांच्या आत करारनामा करुन देणे बंधनकारक राहिल.

**श्रीसाईबाबांचे शुभाशिर्वादांसह**

( राहुल जाधव )
उप मुख्य कार्यकारी अधिकारी, तथा
**प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.



Scanned by CamScanner

# Technical Document

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या इमारतीमध्ये पेस्ट कंट्रोल ( किटकनाशक औषध फवारणी) करणे या कामाची ई-निविदा.

**सन २०२३ - २०२४**

**(एक वर्ष कालावधीकरीता )**

**दि. ०१/ ०४/२०२३ ते दि. ३१/०३/२०२४**



Scanned by CamScanner

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या दोन निवासस्थानांचे इमारतीमध्ये पेस्ट कंट्रोल ( किटकनाशक औषध फवारणी ) करणे या कामाची निविदा.

### सन २०२३ - २०२४

### दि. ०१/ ०४/२०२३ ते दि. ३१/०४/२०२४

### ✡ निविदाधारकाची माहिती ✡

१) निविदाधारकाचे नाव - ------------------------------------------------------------

२) पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता - ------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

३) फोन क्रमांक ऑफीस - ----------------------------------------
निवास - ----------------------------------------
फॅक्स नंबर - ----------------------------------------
ई – मेल - ----------------------------------------

४) संपर्कासाठी व्यक्तीचे नाव - ------------------------------------------------------------
मोबाईल नंबर - ----------------------------------------

५) मालकाचे / भागीदाराचे नाव – १) ------------------------------------------------------------
२) ------------------------------------------------------------
३) ------------------------------------------------------------

६) औद्योगिक रजिस्ट्रेशन नंबर - ----------------------------------------

७) आयकर पॅन नंबर - ----------------------------------------

८) प्रॉव्हींडंड फंड कोड नंबर - ----------------------------------------

९) GST नोंदणी प्रमाणपत्र किंवा ऑनलाईन GST क्रमांक पावती ----------------------------------------

१०) बयाणा रक्कम शासनाचे वेबसाईटवर भरलेली पावती नंबर ----------------------------------------

११) निविदा किंमत शासनाचे वेबसाईटवर भरलेली पावती नंबर ----------------------------------------

दिनांक - / / २०२३
ठिकाण -

निविदाधारकाची सही व शिक्का

------------------------------------------------------------------------------------------------

पा.नं.१

कार्यालयीन कामकाजाकरीता



Scanned by CamScanner

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

साईआश्रम भक्तनिवास , साई धर्मशाळा

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना निविदाधारकाने द्यावयाचे पत्र

दिनांक - / /२०२३

प्रति,

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय,**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

ता- राहाता जि- अहमदनगर

**विषय- संस्थानचे साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या विभागामध्ये सन २०२३ -२४ साठी एक वर्ष कालावधी करीता (दि. ०१/०४/२०२३ ते दि. ३१/०३/२०२४) इमारतीतील हॉल / रुममध्ये ढेकूण, झुरळे इ. किटकांचा त्रास होऊ नये म्हणुन पेस्ट कंट्रोल (किटकनाशक औषध फवारणी) बाबतची ई निविदा.**

मा. महोदय,

खालील सही करणार, मी /आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण संस्थानचे संकेतस्थळ व महाराष्ट्र राज्याच्या संकेत स्थळावर प्रसिध्द केलेली ई –निविदा वाचली. आपल्या ई- निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी / आम्ही वाचल्या असुन सर्व अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत. आम्हाला सेवा करण्यास स्वारस्य व आपल्या अटी- शर्तीचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी / आम्ही आपणास निविदेमध्ये नमुद केलेल्या संस्थानचे साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या इमारतीचे खोल्या / हॉलमध्ये किटकनाशक फवारणी, (पेस्ट कंट्रोल) करावयाचे आहे त्यासाठी लागणारे सर्व साहीत्य / मशिनरी व उच्चतम दर्जाचे औषधे स्वत:च्या खर्चाने वापरावयाचे आहे. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी स्विकारणेची हमी देतो. त्यासाठी लागणा-या मशिनरी व कामगार यांची राहण्याची / जेवणाची / चहापानाची व्यवस्था मी / आम्ही आमचे खर्चाने करु , कामगारांचे वेतन / भविष्यनिर्वाह निधी / व्यवसाय कर / सेवाकर / आयकर वगैरे सर्व कायदेशीर जबाबदारी व त्याबाबत कराव्या लागणा-या पुर्ततेची सर्वस्वी जबाबदारी माझेवर / आम्हावर राहील, याची हमी देत आहे/आहोत.

सदर पत्राव्दारे हमी देतो की, आम्हाला/आमच्या संस्थेला पेस्ट कंट्रोल कामी कुठल्याही शासकीय, निमशासकीय,सहकारी संस्थान अथवा खाजगी संस्था यांनी काळया यादीत (Black Listed ) टाकलेले नाही. सदर माहीती खरी व बरोबर असून, ती चुकीची आढळल्यास आमची निविदा रद्द होणेस पात्र राहील.

नियमाप्रमाणे बयाणा रक्कम रु. /- (अक्षरी रु. मात्रचा) बयाणा रक्कम शासनाचे वेबसाईटवर भरल्याची पावती ---------------------------------------------- व निविदा फी रु. (अक्षरी रु.------------------------ -----------) शासनाचे वेबसाईटवर भरल्याची पावती ------------------------------------------ सोबत जोडली आहे.

माझी/आमची निविदा मंजुर झाल्यास सर्व अटी-शर्ती मान्य असलेबाबत करारनामा करुन देणेस तयार आहे / आहोत त्यास नियमानुसार येणारा खर्च मी /आम्ही करु. उपरोक्त कामाची हमी म्हणुन मंजुर झालेल्या रक्कमेच्या ५ % इतकी रक्कम अनामत म्हणुन रोख भरणा करु. निविदेतील मंजुर दराने काम करुन देणे माझेवर/ आम्हावर बंधनकारक राहील.

आपला / आपले विश्वासु

निविदाधारकांची सही

शिक्का

**निविदाधारकांचे नाव** - ----------------------------------------------------

----------------------------------------------------

**संपुर्ण पत्ता** ----------------------------------------------------

**फोन/ मोबाईल नंबर** ----------------------------------------------------

**ई-मेल** ----------------------------------------------------------



Scanned by CamScanner

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

साईआश्रम भक्तनिवास , साई धर्मशाळा

१) **खालील तपशिलाप्रमाणे तांत्रिक कागदपत्रांची (Technical Bid) स्कॅन करुन ऑनलाईन अपलोड करावेत .**

| अ.नं. | कागदपत्रांचा तपशील | जोडले असल्यास ✓ मार्क करावे |
|---|---|---|
| १ | रु. १५,०००/- बयाना रक्कमेची शासनाचे वेबसाईटवर भरलेली पावती | |
| २ | ई – निविदा फी रु.३,०००/- रक्कमेची शासनाचे वेबसाईटवर भरलेली पावती | |
| ३ | आय.एस.ओ. (I.S.O.) मानांकन ( प्रमाणपत्राची सत्य प्रत). | |
| ४ | Licensing Authority ची प्रमाणीत सत्यप्रत. | |
| ५ | दुकान निरीक्षक यांचा नोंदणीकृत दाखला ( प्रमाणीत सत्यप्रत). | |
| ६ | आयकर नोंदणी पॅन कार्ड (प्रमाणीत सत्यप्रत). | |
| ७ | प्रॉव्हींडंड फंड स्वतंत्र कोड नंबर (कोड ड्रॉप्ट लेटरची प्रमाणीत सत्यप्रत) | |
| ८ | GST नोंदणी प्रमाणपत्र किंवा ऑन लाईन GST क्रंमाक पावती (प्रमाणीत सत्यप्रत). | |
| ९ | शासकीय/निमशासकीय / पंचताराकींत हॉटेल येथे काम करत असलेल्या कामाविषयी कार्यादेशाच्या प्रती (प्रमाणीत सत्यप्रत). | |
| १० | शासकीय कामाचा ३ वर्षाचा अनुभव असावा. | |
| ११ | खालील प्रमाणे कोणतेही एक मान्यता प्राप्त ऑपरेटरचे ट्रेनिंग प्रमाणपत्र असणे आवश्यक.<br>१) Central Food Technological Resarch Institute अथवा<br>२) Technical Training For PMPs अथवा<br>३) Storage Pest Management & Fumigation (भारतीय अनाज संचयन संस्थानचे Indian Grain Storage Institute प्रमाणपत्र) अथवा<br>४) The Pest Management Course कोणत्याही मान्यताप्राप्त Institute चे प्रमाणपत्र<br>• **निविदाधारकाने स्वयंघोषित ऑपरेटरचे ट्रेनिंग प्रमाणपत्र केलेले असल्यास ते ग्राह्य धरले जाणार नाही.** | |
| १२ | सन २०१९-२०२०, २०२०-२०२१ व २०२१-२०२२ या तीन आर्थिक वर्षाचे वार्षिक उलाढालीचे चार्टड अकांऊटंट (Chartered Accountant) यांचेकडील प्रमाणपत्र सत्यप्रती. | |
| १३ | आपल्या फर्मचे नाव ब्लॅक लिस्टेड नसले / असले बाबतचे हमीपत्र लेडर हेडवर सही शिक्यानिशी सादर करावे ( Self Declaration ) | |

निविदाधारकाची सही व शिक्का

( राहूल जाधव )
उप मुख्य कार्यकारी अधिकारी, तथा
**प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.



Scanned by CamScanner

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

साईआश्रम भक्तनिवास , साई धर्मशाळा

# Bill of Quantity (BOQ)

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या इमारतीमध्ये पेस्ट कंट्रोल

(किटकनाशक औषध फवारणी) करणे या कामाची ई- निविदा.

**सन २०२३ - २०२४**

**(एक वर्ष कालावधीकरीता )**

**दि. ०१/ ०४/२०२३ ते दि. ३१/०३/२०२४**



Scanned by CamScanner

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

साईआश्रम भक्तनिवास , साई धर्मशाळा

# पेस्ट कंट्रोल (किटकनाशक औषध फवारणी) निविदा तक्ता

## कालावधी २०२३ – २०२४

## दि. ०१/०४/२०२३ ते दि. ३१/०३/२०२४

निविदाधारकाने साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या इमारतीमध्ये खोल्या/हॉल (भुभाग,छत,भिंती) त्यातील फर्निचर, संडास, बाथरुम, गादया, कॉट इ. मध्ये भक्तांना ढेकुण, झुरळे इ.कीटकांचा त्रास होऊ नये म्हणुन पेस्ट कंट्रोल करणेकामी **एक वर्षकरीता (०६ फवारण्या) प्रती चौरस फुटाचा** दर दयावा. इमारतींचे डग, ड्रेनेज, गॅलरी,पॅसेज इत्यादीचा समावेश त्यात राहील.

| अ.नं | तपशिल | पेस्ट कंट्रोल करणे १२ इमारतीमधील व ६ इमारतीमधील खोल्या,टॉयलेट, बाथरुम व स्टोअर रुम यांचे एकुण चौ-फुट क्षेत्रफळ | एकुण फवारणीचा प्रती चौ. फुट वार्षिक दर ✡ Exclusive of All Taxes ✡ (सहा फवारणी ) रुपये पैसे | औषध फवारणी किती दिवसाकरीता राहील याचा तपशिल द्यावा. | औषधचा प्रभाव कोणकोणत्या किटकांवर होईल याचा तपशिल द्यावा. |
|---|---|---|---|---|---|
| १ | **साईआश्रम भक्तनिवास** १५३६ खोल्या ३४९७३५.०० चौ.फुट | ५०७७१८.३६ चौ. फुट. | | | |
| २ | **साई धर्मशाळा** १९२ हॉल करीता १५७९८३.३६ चौ.फुट | | | | |

**Note :– Rate Of GST as applicable by Govt. time to time**

निविदाधारकाचे पूर्ण नाव-
शिक्का व संपूर्ण पत्ता -
मोबाईल नंबर -

निविदाधारकाची स्वाक्षरी-

( राहूल जाधव )
उप मुख्य कार्यकारी अधिकारी , तथा
**प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.



Scanned by CamScanner